India Media Monitor

# Punyanagari

## Save the Doctors rally in Mumbai today

**Date: 26/08/2013 | Edition: Mumbai | Page: 2 | Source: Bureau | Clip size (cm): W: 15 H: 9**

**Clip: 1 of 1**

# डॉक्टरांना वाचवा! आज मुंबईत रॅली

मुंबई : पोस्ट ग्रॅज्युएट व अंडर ग्रॅज्युएट मेडिकल सीट्सना समान दर्जा द्या, या प्रमुख मागणीसह अन्य मुद्द्यांकडे आरोग्य मंत्रालयाचे लक्ष वेधण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थी येत्या सोमवारी 'डॉक्टरांना वाचवा' या मथळ्याखाली रॅली काढणार आहेत. या अभियानाला इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) आणि असोसिएशन ऑफ हेल्थकेअर प्रोव्हायडर्स इंडिया (एएचपीआय)चा पाठिंबा आहे.

वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि डॉक्टर मंडळी सोमवारी सायंकाळी ४ वाजता हाजी अली येथील इंडियन मेडिकल असोसिएशन हाऊसच्या आवारात एकत्र जमून 'डॉक्टरांना वाचवा'(सेव्ह द डॉक्टर) या अभियानाची सुरुवात करणार आहेत. येथून



महालक्ष्मी रेसकोर्सच्या दिशेने रॅली काढली जाणार आहे. रॅलीदरम्यान मार्गातील झाडांवर सफेद फुगे बांधले जाणार आहेत. ग्रामीण भागातील नियुक्त्यांमध्येही पोस्ट ग्रॅज्युएट व अंडर ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांना समान दर्जा देण्याची मागणी आहे. मुंबईप्रमाणेच देशातील अन्य प्रमुख शहरांत हे अभियान राबवले जात असून, संपूर्ण देशभरातून जवळपास २ ते ३ लाख विद्यार्थी अभियानात सामील होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत मेडिकल इन्स्टिट्यूटमधील पोस्ट ग्रॅज्युएट सीट्सच्या कमी संख्येमुळे तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे. देशात मेडिकल इन्स्टिट्यूटसची सर्वाधिक संख्या असली तरी पोस्ट ग्रॅज्युएट व अंडर ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सीट्सच्या संख्येत तफावत आहे. त्यामुळे तरुण डॉक्टरांना जवळपास १३ वर्षे अभ्यासातच खर्ची घालावी लागत आहेत. हीच परिस्थिती कायम राहिली तर आरोग्य यंत्रणा धोक्यात येणार असल्याची भीती 'इंडियन मेडिकल असोसिएशन'शी संबंधित एका पदाधिकाऱ्याने व्यक्त केली.